## चित्रपट - संत ज्ञानेश्वर

'संत ज्ञानेश्वर' या संत पटात जास्त करुन ज्ञानेश्वरांच्या ओव्यांचाच उपयोग केला गेला होता. तरीही 'आनंद आनंद अवघा' हा आठवल्यांनी लिहिलेला अभंग चपखल बसला आणि 'आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी रे' ह्या खास ग्रामीण थाटाच्या बैलगाडी हाकतानाच्या गाडीवानाच्या गाण्याने मजा आणली.

या चित्रपटाचे वेळी ज्ञानेश्वरीशी झालेली ओळख आठवल्यांनी वाढवली, जोपासली. इतकी की पुढे त्यांनी ज्ञानेश्वरीच्या त्यांच्या अभ्यासातून "ज्ञानदेवीची आराधना" या नावाचा अप्रतिम ग्रंथ लिहिला.

## चित्रपट - संत ज्ञानेश्वर

### आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी रे

आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी रे
करू काम, स्मरू राम, मुखी राम हरी रे

प्रानावानि पिर्ती रानी,
जुपुनिया बैल गुनी
कष्ट क्येलं नांगरुनी
द्येवाची स्वारी आली मिरगावरी रे!

धान्याची पेर झाली
लक्ष्मिनं किरपा केली
मोत्याची रस दिली
शिवारी पीक डोले राजापरी रे!

नाचत्याती पोरं थोरं
बागडती गुरं ढोरं
चला जाऊ समद्या म्होरं
बिगी बिगी बिगी बिगी गाडी हाकू खळ्यावरी रे !

आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी रे
करू काम, स्मरू राम, मुखी राम हरी रे

## चित्रपट - संत ज्ञानेश्वर

### आनंद आनंद अवघा आनंद आगळा

आनंद आनंद अवघा आनंद आगळा

गोविंद गोविंद अवघा मुकुंद सावळा
बहुता दिसांचे तप ये फळाला
आनंद आनंद अवघा आनंद आगळा.

धावुनी भक्तासाठी घननीळ वोळला, कृष्णघन वोळला
बाहेरी भीतरी अवघा आनंद सोहळा
आनंद आनंद अवघा आनंद आगळा